

**अधिक माहितीसाठी संपर्काचा पत्ता**


**उद्यानविद्यावेत्ता**
अ.भा.स.म.पि.योजना
उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली.


मसालापिके घडीपत्रिका क्र. २

# जायफळ सुधारीत जात - कोकण संयुक्ता लागवड तंत्रज्ञान




डॉ. राजन खांडेकर
डॉ. उदयकुमार पेठे
डॉ. राजेश राठोड
डॉ. भरत साळवी
डॉ. पराग हळदणकर

अखिल भारतीय समन्वित मसाला पिके संशोधन योजना, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

जायफळ व जायपत्री असे दोन मसाल्याचे पदार्थ मिळतात. जायफळात नर आणि मादी झाडे वेगवेगळी असतात. नर झाडांपासून फळे मिळत नाहीत. मात्र परागीकरणासाठी किमान १० टक्के नर झाडे बागेमध्ये असणे आवश्यक असते. जायफळाची नविन जात कोकण संयुक्ता या जातीमध्ये नर आणि मादी फूले एकाच झाडावर येतात त्यामुळे फळधारणेमध्ये काही अडचण येत नाही.

**हवामान व जमीन** :—उष्ण व दमट हवामान. अर्ध सावलीत हे पीक चांगले वाढते. पाण्याचा उत्तम निचरा होणारी, गाळाची, गाळ मिश्रित रेताड जमीन त्याचप्रमाणे वरकस जमीन देखील जायफळ लागवडीसाठी चालते.

**सुधारित जात :— कोकण संयुक्ता**

या जातीचे वैशिष्टय म्हणजे या जातीला ना आणि मादी फुले एकाच झाडावर येतात. त्यामुळे बागेत वेगळे नर झाड लावण्याची गरज भासत नाही. उत्पन्न सरासरी ५०० फळे/झाड इतके मिळते. फळे काढणीचा मुख्य हंगाम जून ते नोव्हेंबर असा असतो. फळे मोठया आकाराची असून जायफळचे वजन ९.२० ग्रॅम आणि जायपत्री १.०७ ग्रॅम प्रती फळ इतका असतो. जायफळामध्ये २७% तर जायपत्रीमध्ये १७.७५% तेलाचे प्रमाण असते. एका झाडापासून ४.६० किलो जायफळ तर ५०० ग्रॅम जायपत्री मिळते.

**लागवड** :— ७.५ मी x ७.५ मी अंतर ठेवलेल्या नारळाच्या बागेत चार नारळांच्या झाडांच्या मध्यभागी करावी. सुपारीच्या बागेत ३ x ३ मीटर अंतर असल्यास पहिल्या चार झाडांच्या मध्ये जायफळ लावल्यास नंतरच्या न लावता त्यापुढील चार झाडाच्रूज्ञ मध्ये जायफळ लावावे म्हणजेच अंतर ६ x ६ मीटर सुटेल व झाड चांगले वाढेल. लागवड केल्यानंतर झाडालाआधार दयावाआणि नियमित पाणी पुरवठा करावा.

**जायफळाची अभिवृध्दी** :—जायफळाची अभिवृध्दीमृदुकाष्ठ पध्दतीने कलमे करून करावी.

**आकार देणे** :— कलम लागवड केली असेल तर मात्र सुरवातीच्या काळात जायफळांच्या झाडांना आकार देणे आवश्यक आहे. शेंडा खुडून एकाच दिशेला होणरी वाढ थांबवावी व कलमाच्या जोडावर ३ ते ४ सर्व बाजूने येणाऱ्या फांद्या ठेवून जायफळाच्या झाडाला आकार द्यावा.

**खत पुरवठा** :— पहिल्या वर्षी १० किलो शेणखत तसेच २० ग्रॅम नत्र, १८ ग्रॅम स्फुरद व ५० ग्रॅम पालाश वर्षातून दोनदा विभागून द्यावे. याच प्रमाणात खतात वाढ करत न्यावी आणि १५ वर्षानंतर प्रत्येक झाडाला ५० किलो शेणखत, ५०० ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद व १००० ग्रॅम पोटॅश द्यावे. खताची मात्रा जून व ऑक्टोबर अशा दोन महिन्यात विभागून द्यावी.

**पाणी पुरवठा** :—जायफळ हे बागायती पीक आहे. झाडाला पाण्याचा ताण सहन होत नाही. झाडाला नियमित पाणी पुरवठा करावा.

**काढणी** :—४ ते ५ व्या वर्षी फळे येतात. जून—नोव्हेंबर मध्ये सर्वात जास्त फळे मिळतात. तयार झालेले फळ आपोआप तडकते. आतमधील जायपत्री व त्यातील जायफळ दिसू लागते. तयार झालेली फळे बऱ्याचदा गळून पडतात. जायफळ बी १५ ते २० दिवसात वाळते तर जायपत्री वाळायला ५ ते ७ दिवस लागतात.

**रोग व किड नियंत्रण :—**

१. **फळकूज/फांदीमर** : फांदया व शेंडे टोकाकडून मागे वळतात. पाने व फळे तपकिरी होऊन कुजून गळतात.

२. **पर्णकूज/पर्णछिद्र:** पानांवर तपकिरी ठिपके वाढुन त्यावरील मेलेल्या पेशी गळून पानावर छिद्रे पडतात.

**नियंत्रणाचे उपाय:** बागेचीस्वच्छता राखावी. रोग प्रथम दिसताच १ टक्के बोर्डो मिश्रण किंवा डायफोलेटान ०.२ टक्के च्या १५ दिवसांच्या अंतराने फवारण्या कराव्यात.